# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, ४११००४.

विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०१७ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

# प्र क ट न

फेब्रुवारी-मार्च २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम | मंगळवार दि.२८ फेब्रुवारी २०१७ ते शनिवार २५ मार्च २०१७ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | मंगळवार दि.०७ मार्च २०१७ ते बुधवार २९ मार्च २०१७ |

विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने तसेच शाळा/कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने फेब्रुवारी-मार्च २०१७ च्या लेखी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक २८/१०/२०१६ पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल. सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी तसेच वेळापत्रकाबाबत काही सुचना, हरकती असल्यास त्या विभागीय मंडळाकडे तसेच राज्य मंडळाकडे १५ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पाठवाव्यात.

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४

---

क्रमांक-पु.वि.मं./माध्य.डी.पी./ 1527
पुणे ४११ ००५.
दि.२९.१०.२०१६

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त शाळा,
जिल्हा-पुणे/अहमदनगर/सोलापूर.

उपरोक्त प्रकटनाची नोंद घेवून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

29/10/2016
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११ ००५.